## प्रस्तावना

एकोणीसाव्या शतकातील एक कृतिशील विचारवंत म्हणून महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याची नोंद महाराष्ट्राच्या समाज-सुधारणा इतिहासात प्रामुख्याने घ्यावी लागते. समाजाच्या प्रगतीच्या दिशा स्पष्ट, खुल्या व्हाव्यात आणि बहुजन समाजातील म्हणजेच दुर्बलांच्या प्रगतीच्या मार्गातील अडसर दूर व्हावेत यासाठी महात्मा फुले यांनी विचार मांडले व प्रत्यक्ष आचरणात आणले.

तत्कालिन समाज जीवनामध्ये धार्मिकतेचा असलेला पगडा आणि अज्ञानांधकार यांच्या ओझ्याखाली मागासवर्गीय व दुर्बल गाडले जात होते. त्यांच्यावर वरिष्ठांकडून जुलूम होत होता. त्यांची लुबाडणूक होत होती. याचा मनस्वी संताप जोतीरावांना येत होता. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी तत्कालिन वास्तवावर वाङ्मयाच्या माध्यमातून केलेले प्रहार होत. जोतीराव फक्त विचारांवर थांबले नाहीतर तर ते प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला.

जोतीरावांचा संघर्ष दांभिक धर्म मार्तंडांशी होता. दुर्बलांच्या अज्ञानाचा फायदा धर्ममार्तन्ड घेत होते. त्यात प्रामुख्याने स्त्रिया, शेतकरी, कष्टकरी अशा दुर्बल घटकांची लुबाडणूक होत होती. त्यांचा उधार घडवायचा असेल तर त्यांच्यामधील अज्ञान, अंधश्रध्दा नाहिशा झाल्या पाहिजेत. यासाठी जोतीरावांनी गरिबांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले धार्मिक खोटेपण जगजाहीर केला.

धार्मिक व सामाजिक जुनाट आणि अमानवी पध्दती नाहीशा होण्याबरोबरच दुर्बलांची आर्थिक स्थिती सुधारणे आवश्यक होते. आर्थिक विषमता कमी कशी होऊ शकेल यासाठी जोतीरावांनी प्रयत्न केले.

शेती हा तत्कालीन समाजव्यवस्थेत प्रमुख आधार होता. त्यामध्ये रात्रंदिवस गरीब झटत होते, राबत होते परंतु त्यांच्या पदरी काहीच पडत नव्हते. हा शेतकरी आणि त्याचे वास्तव जीवन जोतीरावांनी ' शेतकऱ्याचा असूड ' मध्ये रेखाटले आहे. त्यामध्ये " जमिनीची सुधारणा कशी करावी, धरणे, पाटबंधारे कोठे बांधावे, गुरांची उत्तम निपज कशी करावी, जमिनीची धूप थांबविण्यास काय करावे, शांततेच्या काळात शेतीसुधारणेच्या विधायक कामासाठी सैनिकांचा उपयोग कसा करता येईल. अन्य सुधारलेल्या राष्ट्रात शेती कशी केली जाते याचे शिक्षण देऊन भारतातील शेतकरी मुलांना परदेशात पाठवून आणणे कसे आग्रहाचे आहे, शेतकीची वार्षिक प्रदर्शने भरवून उत्तम पीक काढणाऱ्या शेतकऱ्यास पारितोषिके देणे कसे उपकारक ठरणारे आहे. या सारख्या विधायक सूचनांबरोबर शेतातून चोऱ्या झाल्यास पोलिसांना दंड का केला पाहिजे, सावकार, व्यापाऱ्यांवर करडी नजर कशी ठेवली पाहिजे, ब्रिटीश भांडवलदारांचे अवाच्या सवा व्याज का बंद केले पाहिजे, शेतीस आवश्यक असलेल्या पशुधनाच्या रक्षणासाठी गोवध बंदी कशी आवश्यक आहे, शेतकऱ्यांच्या मुलांच्या नैतिक अध:पात होऊ नये, म्हणून कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत " अशासारख्या जोतीरावांनी सुचवलेल्या अनेक गोष्टींचा विचार कृषी अर्थशास्त्रात आजही उपकारक ठरू शकेल आणि त्यासाठी एक कृषी अर्थतज्ञ म्हणून ' महात्मा जोतीराव फुले ' यांच्या कृषी विषयक विचारांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केला आहे. हा शोधनिबंध तयार करताना प्रामुख्याने पुढील उद्देश डोळ्यासमोर ठेवले होते.

१) महात्मा फुले यांचा शेतीविषयक विचार समजावून घेणे.
२) १९ व्या शतकातील विशेषत: महाराष्ट्रातील शेती-
   विषयी माहिती करून घेणे.

३) महात्मा फुले यांच्या काळातील आर्थिक स्थिती.

४) कृषी अर्थतज्ञ म्हणून महात्मा फुले यांचा अभ्यास करणे.

हा विषय शास्त्रीय पध्दतीने मांडता यावा यासाठी ज्यांचे मार्गदर्शन मला सतत लाभले ते माझे संशोधक मार्गदर्शक प्रा. जे.एफ. पाटील यांचे प्रती कृतज्ञता व्यक्त करणे माझे कर्तव्य आहे.

तसेच एकूण एम्.फिल्.च्या अभ्यास कालखंडात प्रा. रविंद्र दोशी, अर्थशास्त्र विभाग प्रमुख आणि त्याच बरोबर डॉ. जुगळे, डॉ.डांगे, प्रा. दंडगे, प्रा. कक्डे आणि प्रा. गावडे यांचे मार्गदर्शनही सतत लाभले. त्या सर्वांची मी ऋणी आहे. तसेच श्री. साबळे आणि श्री. शेख यांचेही त्यांनी या कामी दिलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहे.

(सौ. नूतन मालचंद्र विभूते)

कोल्हापूर

दिनांक : १०-१२-१९९३